सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

## शिवसेनेची सुनावणी आता ४ ऑगस्टला

नवी दिल्ली : शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्हावरील अधिकाराच्या वादाची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी निर्णायक टप्प्यात पोहोचली आहे. निवडणूक आयोगाच्या २०२३ मधील निर्णयाविरोधात ठाकरे गटाने दाखल केलेल्या याचिकेवर अंतिम युक्तिवाद सुरू असून, न्यायालयाने दोन्ही बाजूंना लेखी मुद्दे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. पुढील सुनावणी ४ ऑगस्ट रोजी होणार आहे.

ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी पक्षांतरामुळे लोकशाही प्रक्रियेवर परिणाम होत असल्याचे न्यायालयात नमूद केले. तसेच निवडणूक आयोगाने पक्षघटना आणि पक्षप्रमुखांच्या अधिकारांचा पुरेसा विचार न करता निर्णय दिल्याचा दावा केला.जून २०२२ मधील शिंदे बंडानंतर शिवसेना पक्षाचे नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्ह शिंदे गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला होता. त्याविरोधातील याचिकेवर गेल्या तीन वर्षांपासून सुनावणी सुरू असून, आता या प्रकरणाच्या निकालाकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

• वर्ष २४ वे • अंक २७४ • गुरुवार दि.३० जुलै २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# नांदेड जिल्ह्यात पावसाची जोरदार बॅटींग ;नदी,नाले तुडूंब

## किनवटमध्ये दोन दिवसांपासून मुसळधार कंचलीचा ग्रा.पं.सेवक पुरात गेला वाहून



किनवट/प्रतिनिधी-सलग दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे उमरी बाजार मंडळात अतीवृष्टी झाली आहे. कंचली गावालगतच्या नाल्याच्या पुरात कंचली ग्रामपंचायतीचा ३२ वर्षीय सेवक राजू रेड्डी दांडेलु हा २९ जुलै रोजी सायंकाळी वाहून गेला आहे. पोलीस प्रशासन, महसूल विभाग आणि स्थानिकांच्या मदतीने शोधकार्य सुरु असून सतत पाऊस चालू असल्याने अद्यापही शोध लागलेला नाही. पावसामुळे किनवट तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे.

किनवट तालुक्यात ३० जुलै रोजीही अखंड पाऊस चालू असल्याने पैनगंगेसह नदीनाल्यांची पूरस्थिती बिकट होतांना दिसते. पावसाने उसंत घेतली नसल्यास नदीनाले फुटून शेती आणि पीकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. किनवट आणि गोकुंदा शहरातील पूरग्रस्त भागातील लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बुधवार दि.२९ जुलै रोजी दिवसभर पाऊस चालू होता. शेतीसाठी पावसाची आवश्यकता होती. सलगच्या पावसामुळे मात्र शेतकऱ्यांच्या शेतपीकांचे आणि शेतीचे गणित विस्कळीत करण्याची दाट शक्यता दिसते. किनवट तहसील कार्यालयाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडील प्राप्त माहितीनुसार, किनवट तालुक्यातील कंचली (इस्लापूर) ग्रामपंचायतीत सेवक म्हणून कार्यरत असलेला राजू दांडेलु हा सायंकाळी कंचली येथून रेवानाईक तांड्याकडे जात असताना कंचली गावालगत असलेल्या कंचली आंदबोरी मार्गावरील नाल्याच्या पुरात वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडलीय. पुलाची उंची कमी असल्याचा हा परिणाम आहे.

सदरील घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी पोलिस प्रशासनासह तहसील प्रशासनाला माहिती दिली. त्यावरून इस्लापूर पोलीस ठाण्याचे सपोनि रमेश जाधवर यांनी त्यांच्या टीमसह घटना स्थळ गाठले. महसूलचे मंडळाधिकारी बालाजी पुष्पलवार, ग्राम महसूल अधिकारी हंबर्डे आणि कोतवाल संतोष बिल्ललवार यांचीही टीम पोहोचली. गावकऱ्यांच्या मदतीने कालपासून शोधकार्य चालू आहे. आज (३० जुलै) दुसऱ्या दिवशीही दुपारपर्यंत शोध लागलेला नाही. आज दिवसभर ढगांच्या गडगडाटासह संततधार पाऊस चालू असल्याने शोधकार्यात व्यत्यय निर्माण होतोय. सततच्या पावसामुळे पांगरपहाड, आंदबोरी, रेवानाईकतांडा आणि अप्पारावपेठसह काही गावांचा संपर्क तुटला.

नदीनाल्यांची पूरस्थिती पहाता रात्री किनवट आणि गोकुंदा शहरातील पुरग्रस्त परिसरातील नागरिकांनी सावधान राहिल्यास सोयीचे होईल. दरवर्षीच पुरग्रस्त परिसरातील नागरिकांना प्रशासनाकडून सुरक्षित स्थळी हलविल्या जाते. प्रशासन सज्ज असल्याचे सांगण्यात येते. रात्री पावसाचे प्रमाण असेच राहिल्यास शेतीला आणि पीकांना पुराच्या पाण्याचा फटका बसू शकतो.

## हवामान विभागाचा 'रेड अलर्ट'



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. किनवट तालुक्यातील उमरी बाजार मंडळाअंतर्गत अतिवृष्टी झाली असून पावसामुळे पिके संकटात सापडली आहेत. हवामान विभागाने नांदेड जिल्ह्यात दुपारी तीन तासांसाठी पावसाचा रेड अलर्ट जारी केला होता. अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस पडल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

बुधवार दुपारपासूनच नांदेड जिल्ह्यात पावसाला सुरुवात झाली. काही ठिकाणी रिमझिम तर काही भागात जोरदार पावसाने हजेरी लावली. रात्रभर जिल्ह्यात पाऊस सुरुच होता. आज (गुरुवार) सकाळपासूनच पाऊस पडत असल्याने नांदेड शहरातील रस्त्यांवर पाणी साचले होते. सतत दोन दिवसांपासून पाऊस पडत असल्याने नदी, नाले तुडूंब भरुन वाहत आहेत. नांदेड जिल्ह्यात वाहणाऱ्या गोदावरी, पैनगंगा, मांजरा या प्रमुख नद्यांसह इतर नदी व नाले तुडूंब भरुन वाहत आहेत. विष्णुपूरी प्रकल्पाच्या पाणीसाठ्यातही वाढ झाली. सततच्या पावसामुळे नांदेड जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झालेले असून बुधवारी सायंकाळी कंचेली ता.किनवट येथील सेवक हा गावाकडे परत जाताना पुलावरील पाण्यात वाहून गेला आहे.

मुंबई येथील प्रादेशिक हवामान केंद्राने नांदेड जिल्ह्यासाठी दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत पावसाचा रेड अलर्ट जारी केला होता. नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी अतिवृष्टीची शक्यता व्यक्त करण्यात आली **पान ४ वर**

## गुप्त धनासाठी बालकाचा नरबळी देण्याचा प्रयत्न

### महिलेच्या तक्रारीवरुन सहा जणांविरुद्ध गुन्हा

नांदेड/प्रतिनिधी-घरातील गुप्त धन काढण्यासाठी दोन मुलांचा नरबळी देण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहा जणांविरुध्द महिलेच्या तक्रारीवरुन नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वाजेगाव येथील एका घरात गुप्त धन असल्याचे भोंदूबाबाने घरातील व्यक्तींना सांगितले होते. गुप्त धनासाठी भोंदूबाबाने पूजा-अर्चा केली होती. त्यानंतर हे गुप्त धन बाहेर काढण्यासाठी घरातील दोन लहान मुलांचा नरबळी देण्याची मागणी करण्यात आली. गुप्त धनासाठी गौसीया बेगम या महिलेने आपल्या दोन नातवांचा बळी देण्याचा प्रयत्न सुरु केला होता. परंतु या मागणीला मुलांची आई इरफाना बेगम सलीम यांनी तीव्र विरोध केला. सदर महिलेस घरातील नातेवाईकांनी बेद्दम मारहाण केली. त्यानंतर पीडीत इरफाना बेगम सलीम यांनी दि.२८ जुलै रोजी विशेष पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांची भेट घेवून सदरील माहिती देवून कारवाई करण्याची मागणी केली. घटनेचे गांभिर्य ओळखून पोलीस उपमहानिरिक्षक शहाजी उमाप यांनी कारवाई करण्याचे निर्देश नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनला दिले. इरफाना बेगम शेख सलीम यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सासु गौसीया बेगम, दिर एजाज महेबुब शेख, नंनद शबाना शेख, इतर नातेवाईक व गोकुळनगर भागातील संबंधीत भोंदूबाबा यांच्या विरुध्द विविध कलम तसेच अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रेवा काळे व फौजदार स्वप्नील साळुंके हे करीत आहेत. या घटनेमुळे वाजेगाव परिसरात एकच खळबळ उडाली.

## रस्ता खचला,प्राध्यापकाची कार खड्डयात

### एनएसबी कॉलेज समोरील दुपारची घटना;प्रसंगावधानाने जीव वाचला



नांदेड/प्रतिनिधी-शहरातील नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयासमोरील रस्त्यावर शुक्रवारी अचानक जमीन खचल्याने एक मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. प्रा. चंद्रशेखर एगडे यांची चालती कार क्षणार्धात खड्ड्यात रुतली. प्रसंगावधान राखत त्यांनी तातडीने वाहनातून बाहेर उडी मारल्याने त्यांचा जीव वाचला.

घटनेनंतर परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली. माहिती मिळताच पोलीस व महापालिका प्रशासन घटनास्थळी दाखल झाले. वाहतूक तात्पुरती वळवून परिसर सुरक्षित करण्यात आला.प्राथमिक माहितीनुसार, रस्त्याखाली पोकळी निर्माण झाल्याने ही घटना घडल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेत जीवितहानी झाली नसली तरी कारचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेमुळे शहरातील रस्त्यांच्या गुणवत्तेवर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

महापालिकेत सुरु असलेल्या एका बैठकी दरम्यान या घटनेची माहिती मिळताच उपमहापौर दीपकसिंह रावत मनपाच्या अधिकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले आहेत. मनपाच्या अग्निशामन दलाच्या पथकाने क्रेनच्या साह्याने सदरील कार खड्डयातून बाहेर काढली. कारचे बरेच नुकसान झाले आहे.

#### नागरिकांचा संताप

काही दिवसांपूर्वी या रस्त्यांवर ड्रेनज व रस्त्याचे काम झाले होते. ड्रेनचा खड्डा आतुन ढासळल्याने हा अपघात झाल्याचे या भागातील नागरिकांनी सांगितले. कोट्यावधी रुपये खर्च करुन शहरात दर्जाहीन विकासकामे सुरु असल्याबद्दल नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत.

## नांदेड शहरातील रस्ते विकास कामांचा महापौरांनी बैठकीत घेतला आढावा

### कामांचा दर्जा व वेळेच्या पूर्ततेबाबत कडक निर्देश




नांदेड/प्रतिनिधी-सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत शहरात पूर्ण झालेल्या आणि सद्यस्थितीत सुरू असलेल्या रस्त्यांच्या विविध कामांचा सविस्तर आढावा महापौर सौ.कविता मुळे यांनी बैठकीत घेतला आहे. कामाचा दर्जा व रस्त्याची कामे वेळेत पुर्ततेबाबत कडक निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले आहे.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेत आज (गुरुवार) दि.३० जुलै रोजी महापौर सौ.कविता संतोष मुळे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील रस्त्यांच्या कामासंदर्भात एक महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे, उपमहापौर दिपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, माजी महापौर जयश्री पावडे, माजी सभापती किशोर स्वामी, नगरसेवक प्रशांत तिडके, सतीष देशमुख, संजय घोगरे, अभिषेक सौदे, तुलजेश यादव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रामकृष्ण गळधर, उपअभियंता एस.बी.नरमीटवार, सहाय्यक अभियंता एस.बी.नाईक, पालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, शहर अभियंता सुमंत पाटील, कार्यकारी अभियंता दिलीप टाकळीकर, उपअभियंता खुशाल कदम आणि मनपाचे इतर तांत्रिक अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत प्रामुख्याने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शहराच्या मुख्य भागांत पूर्ण झालेल्या रस्त्यांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच सद्यस्थितीत प्रगतीपथावर असलेल्या कामांच्या प्रगतीचा अहवाल अधिकाऱ्यांनी सादर केला. रस्त्यांची कामे करताना गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड करता येणार नाही, असे महापौरांनी स्पष्ट केले. कामांचा दर्जा उत्तम राखण्यासाठी नियमित तपासणी व देखरेख करण्याचे आदेश देण्यात आले. त्याचप्रमाणे सुरू असलेली कामे निर्धारित वेळेत पूर्ण करून नागरिकांना होणारा त्रास तात्काळ कमी करावा, अशी सूचना मनपा आयुक्तांनी केली. रस्ते खोदाई, पाईपलाईन, आणि वीज वाहिन्यांच्या कामांमुळे नूतनीकरण केलेल्या रस्त्यांचे नुकसान होऊ नये म्हणून महानगरपालिका आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी आपापसात योग्य समन्वय राखूनच कामे करावीत, असे निर्देश देण्यात आले. या बैठकीत उपस्थित नगरसेवकांनी आपआपल्या प्रभागा संदर्भातील तक्रारी मांडल्या. शहरात बहुतांश ठिकाणी गतीरोधकामुळे अपघात होत असल्याने अनावश्यक ठिकाणचे गतिरोधक काढुन आवश्यक त्या ठिकाणी जसे शाळा, दवाखाने, कोचिंग क्लासेस, चौक इत्यादी ठिकाणी गतिरोधक ठेवण्याच्या सुचना देण्यात आल्या. बऱ्याच रस्त्यांची उंची अनावश्यक वाढल्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत असल्याचे यावेळी नगरसेवकांनी सांगितले. शहरातील यशवंत कॉलेज ते श्याम नगर दवाखाना हा रस्ता खुप दिवसा पासुन प्रलंबित असल्याने सदरील काम तात्काळ पूर्ण करावे. जुना कौठा, सिडको भागातील झालेल्या रस्त्यांमुळे नागरिकांना सांडपाण्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याने त्वरीत उपाययोजना कराव्यात. जुन्या नांदेड भागातील रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादन करण्यात आलेल्या जागेनुसार रस्त्याची रुंदी असावी अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# कायदा झाला आता कसोटी अंमलबजावणीची!

**लोकशाहीतील संसद ही केवळ कायदे करणारी संस्था नाही, तर देशातील जनतेच्या आशा–आकांक्षांना दिशा देणारे सर्वोच्च व्यासपीठ आहे. त्यामुळे संसदेतील प्रत्येक अधिवेशनाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागलेले असते. यंदाच्या पावसाळी अधिवेशनातही देशाचे लक्ष संसदेकडे होते; मात्र विकास, रोजगार, शिक्षण आणि जनहिताच्या प्रश्नांइतकीच आरोप–प्रत्यारोपांची चर्चा गाजली.यंदा अल निनोच्या प्रभावामुळे देशाच्या काही भागांत अतिवृष्टी होऊन पूरस्थिती निर्माण झाली, तर काही भागांत अपुऱ्या पावसामुळे दुष्काळाची चिन्हे दिसू लागली. निसर्गात पावसाचे असमान वितरण पाहायला मिळाले; पण संसदेत मात्र आरोपांचा महापूर उसळला होता. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या मुद्द्यावरून जवळपास आठवडाभर सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांवर आरोपांची सरबत्ती करत राहिले. देशातील लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित प्रश्नावर व्यापक आणि विधायक चर्चा होण्याची अपेक्षा असताना राजकीय संघर्षानेच अधिक लक्ष वेधून घेतले. अखेरीस स्पर्धा परीक्षा सुधारणा विधेयक चर्चेसाठी आले आणि संसदेचे कामकाज मूळ विषयाकडे वळले. प्रश्नपत्रिका फुटी, परीक्षांमधील गैरव्यवहार आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने कठोर कायदा आणला. हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. चर्चेदरम्यान विरोधक आपली भूमिका मांडत असताना सत्ताधारी सदस्यांकडून वारंवार आक्षेप घेतले जात असल्याचेही चित्र देशाने पाहिले. लोकशाहीत मतभेद स्वाभाविक असले तरी त्यावर उत्तर देण्याचा मार्ग म्हणजे सुसंस्कृत आणि सखोल चर्चा, व्यत्यय नव्हे. लोकसभेत संख्याबळाच्या बळावर हे विधेयक मंजूर झाले. संसदीय लोकशाहीत बहुमताचा निर्णय अंतिम असतो, यात शंका नाही. मात्र कायदा मंजूर होणे आणि तो प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविणे या दोन भिन्न गोष्टी आहेत. त्यामुळे आता संपूर्ण देशातील तरुणाईचे लक्ष या नव्या कायद्याच्या अंमलबजावणीकडे लागले आहे. कारण प्रश्न केवळ कठोर तरतुदींचा नाही, तर त्या तरतुदींची निष्पक्ष आणि प्रभावी अंमलबजावणी होण्याचा आहे. भारतामध्ये कायद्यांची कमतरता नाही. अनेक क्षेत्रांत कठोर आणि प्रभावी कायदे अस्तित्वात आहेत. परंतु अनेकदा त्यांची काटेकोर अंमलबजावणी होत नसल्याने अपेक्षित परिणाम दिसून येत नाहीत. उदाहरणार्थ, खुनासारख्या गंभीर गुन्ह्यासाठी मृत्युदंडाची तरतूद आहे. तरीही समाजातील हत्यांचे प्रमाण पूर्णपणे थांबलेले नाही. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने दिल्लीतील निर्भया प्रकरणानंतर कठोर कायदे करण्यात आले, शिक्षाही अधिक कडक करण्यात आल्या. परंतु आजही महिलांवरील अत्याचार, लैंगिक हिंसा आणि बलात्काराच्या घटना चिंताजनकरीत्या घडत आहेत. भ्रष्टाचार रोखण्यासाठीही अनेक कायदे, चौकशी यंत्रणा आणि नियंत्रण व्यवस्था कार्यरत आहेत; तरीही भ्रष्टाचाराच्या बातम्या सातत्याने समोर येतात. यावरून कायदा असणे आणि त्याची प्रभावी अंमलबजावणी होणे या दोन वेगळ्या गोष्टी असल्याचे स्पष्ट होते. स्पर्धा परीक्षा सुधारणा कायद्याचे भवितव्यही याच निकषावर ठरणार आहे. प्रश्नपत्रिका फुटवणाऱ्या टोळ्यांवर तातडीने कारवाई झाली, दोषींना वेळेत कठोर शिक्षा झाली, परीक्षा घेणाऱ्या संस्थांची जबाबदारी निश्चित झाली आणि संपूर्ण परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक झाली, तरच या कायद्याचा उद्देश सफल होईल. अन्यथा हा कायदाही केवळ कागदावरील कठोर तरतुदींपुरता मर्यादित राहण्याची भीती व्यक्त केली जाईल. देशातील लाखो विद्यार्थी अनेक वर्षे मेहनत करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. त्यांच्या घामाचे, परिश्रमाचे आणि स्वप्नांचे संरक्षण करणे ही कोणत्याही सरकारची नैतिक जबाबदारी आहे. त्यामुळे केवळ कठोर शिक्षा जाहीर करून चालणार नाही; तर तंत्रज्ञानाधारित परीक्षा व्यवस्था, पारदर्शक प्रक्रिया, स्वतंत्र देखरेख आणि राजकीय हस्तक्षेपापासून मुक्त प्रशासन उभारणे तितकेच आवश्यक आहे. संसद हे लोकशाहीचे मंदिर आहे. त्या मंदिरात वादविवाद व्हावेत, मतभेद व्यक्त व्हावेत; पण त्यातून जनहिताचा मार्ग निघाला पाहिजे. पावसाळी अधिवेशनाने देशाला एक महत्त्वाचा कायदा दिला आहे. आता या कायद्याची खरी परीक्षा संसदेत नव्हे, तर देशभरातील परीक्षा केंद्रांवर आणि तपास यंत्रणांच्या कामगिरीत होणार आहे. कायदा संख्याबळावर मंजूर होतो; पण त्याचे यश केवळ आणि केवळ प्रामाणिक अंमलबजावणीवरच ठरते. देशातील कोट्यवधी विद्यार्थ्यांना आज नव्या कायद्यापेक्षा त्या कायद्यामुळे मिळणाऱ्या न्यायाची अधिक प्रतीक्षा आहे.**

# "जेन-झीला 'गटार पिढी' म्हणणाऱ्या कंगनांनी आधी स्वतःच्या वक्तव्याचा आरसा पाहावा!"






जेन-झी पिढीला गटार पिढी आहे,म्हणणाऱ्या कँगनाने स्वतःचा चेहरा आरश्यात पहावा नंतर समजेल कोण गटार आहे आणि कोण शुद्ध आहे.कँगना रानावत लोकप्रतिनिधी आहेत आणि त्या देशाचे नेतृत्व करीत आहे अशा परिस्थितीत आपण काय बोलतो याचे भान त्यांनी ठेवले पाहिजे.सर्वसामान्य जनता बोलतांना आपल्या जिभेवर थोडासा तरी ताबा ठेवतो.परंतु कँगनाला स्वतःच्या बोलण्यावर भान नसल्याचे दिसून येते. कँगना रानावत म्हणते की, पाश्चात्य प्रभावाखालील भारतीय महिलांची नवी पिढी जनरेशन गटर आहे.कँगनाने लक्षात ठेवले पाहिजे की,भारतात पाश्चात्य पध्दतीचा प्रभाव चित्रपट सृष्टीपासून वाढला आहे आणि त्यात आपणही सहभागी होता आणि आहात.सध्याच्या चित्रपटांमध्ये पाश्चात्य पध्दती प्रभावशाली होत आहे हे तुम्हाला दिसत नाही का? त्यामुळे हिंदू संस्कृतीचे वाटोळे होत आहे हे लक्षात येत नाही का?अशा परिस्थितीत तुम्ही पाश्चात्य पध्दतीचा संसदेत विरोध का करीत नाही?परंतु अभद्र वक्तव्य करून कँगनाने लोकप्रतिनिधी या पदाला कलंकित केले आहे.

जेन-झीचे आंदोलन तब्बल ३५ दिवस चालले आणि सरकारच्या माध्यमातून ३६ व्या दिवशी तोडगा निघाला.या आंदोलना दरम्यान सोनम वांगचूक यांनी उपोषण सुध्दा केले व अनेक सामाजिक संघटनांनी आणि विरोधी पक्षांनी पुर्णपणे समर्थन दिले.यावर तोडगा काढण्यासाठी सरकार मार्फत तीन फेऱ्यांच्या चर्चा झाल्या आणि सरकार सुध्दा कॉकरोच जनता पार्टी समोर झुकले. पक्ष-विपक्ष व सरकार विद्यार्थ्यांच्या आंदोलनाचा तोडगा निघावा यासाठी प्रयत्नशील होते.हे सर्व झाल्यानंतर आणि तोडगा निघाल्यानंतर युवा पिढी बद्दल घाणेरड्या दर्जाचे वक्तव्य करने एका लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही असे मला वाटते.कँगनाने याचा विचार केला का की, लाखो युवा रस्त्यावर का आले? त्यांच्या भावनांना किती मोठी ठेस पोहोचली असावी याचा विचार केला का?युवकांच्या भावनांचा थोडासाही विचार न करता आपल्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी वाटेल ते घाणेरडे वक्तव्य एखाद्या लोकप्रतिनिधीने करने म्हणजे लोकशाहीला काळीमा फासणारे म्हणावे लागेल.जंतमंतरचे आंदोलन चित्रपट नसून लोकशाही आहे हे कँगनाने लक्षात ठेवले पाहिजे.आज पेपर फुटीमुळे देशाच्या शिक्षण प्रणालीवर मोठा काळा धब्बा लागला आहे आणि ही घटना संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली.कारण राजकीय पुढाऱ्यांचे मुले विदेशात शिकतात ते कँगणाला दिसत नाही का?आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांना आपल्या मुलांना सरकारी शाळा-महाविद्यालयाल शिकवायला लाज वाटते. राजकीय पुढाऱ्यांचे मुले जर सरकारी शाळा-महाविद्यालयात शिकली असती तर देशात पेपर फुटीचा प्रकार दिसलाच नसता व जेन-झी रस्त्यावर आल्याचे दिसले नसते.राजकिय पुढाऱ्यांचे मुले विदेशात आणि सर्वसामान्यांची मुले देशात शिकत आहे आणि त्यातही पेपर फुटी या असहय्य वेदना युवकांना कशा काय सहन होणार?आज जेन-झी देशाचे भविष्य आहे हेही लक्षात ठेवले पाहिजे.आज युवकांना काय वेदना होत आहे याची जाण कँगणाला नसावी.जेन-झीने जे काही केले ते आत्म्यातुन केले आणि कँगना जे घृणास्पद वक्तव्य केले ते राजकीय प्रेरीत आहे ही बाब कँगना राणावत ने लक्षात ठेवली पाहिजे आणि गटार जेन-झी आहे की स्वतः कँगना आहे हे सरकारने ठरवून कँगना राणावतच्या घृणास्पद वक्तव्यावर लगाम कसली पाहिजे. कँगना राणावत यांनी जेन-झीचा उल्लेख गटार पिढी असा करून युवकांच्या जखमेवर मिठ चोळण्याचे काम केले.कँगना रानावत यांनी जेन-झीचा उल्लेख गटार पिढीअसा केला आणि त्यांच्या ध्वनि चित्रफिती पाहून आपल्याला मळमळते,ओकाऱ्या येते असे इन्स्टाग्रामवर लिहिले.जंतरमंतर येथे झालेली निदर्शने घाणं, कचरा आणि कुरूपतेचे दर्शन होते,असे रानावत यांनी म्हटले आहे.सोशल मीडियावर जेन-झीचे व्हायरल रील्स पाहून मला ओकारी आल्यासारखे वाटते.हे लोक ड्रग्स आणि दारू पिण्याच्या स्वातंत्र्याचा अभिमान बाळगत आहेत.कँगना रानावतला दारू आणि ड्रग्स सारख्या नशेली पदार्थांची एवढी घृणा वाटत आहे तर आतापर्यंत सरकारने किंवा कँगनाने दारू बंदी किंवा नशेली पदार्थांबद्दल आवाज का उठवला नाही व दारू किंवा नशेली पदार्थांच्या फॅक्टऱ्या बंद का केल्या नाहीत. आपण काय बोलतो याचे भान रानावत यांनी ठेवले पाहिजे. जेन-झीच्या आंदोलनावर सरकार एकीकडे तोडगा काढत आहे तर, दुसरीकडे कँगना रानावत सीजेपीच्या आंदोलनावर अभद्र भाषा बोलुन युवा पिढीच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करीत आहे ही बाब लोकप्रतिनिधीला शोभा देत नाही.कँगना म्हणते कॉकरोच गंघगी पसरवित आहे, कँगनाजी आपण थोड्या चुकलात कॉकरोच गंधगी पसरवित नसुन गंधगी साफ करण्याचे काम करीत आहेत आणि करून दाखवले म्हणून तुम्हाला कॉकरोच गटार वाटत आहे.चित्रपटामध्ये काहीही बोलले तर चालते,परंतु इथे कृती करून दाखवावी लागते. कॉकरोच जनता पार्टी सहजच तयार झाली नसुन तुम्ही चुका केल्या म्हणून ती तयार झाली आहे आणि तुमच्या चुकांचे निराकरण करण्यासाठी ते ठाम आहेत.कँगना म्हणते की,मैने अपनी जिंदगी मे कभी किसी एक जगह पर इतना भद्दापन नहीं देखा बरोबर आहे आपण पाहुही शकत नाही.कारण आतापर्यंत तुम्ही चित्रपटांमध्ये काम करायच्या आता तुम्हाला लोकांमध्ये करावे लागत आहे आणि लोकांनामध्ये काम करतांना कसे बोलावे याचा तुम्हाला अभ्यास नसावा.कारण तुमच्या वक्तव्यावरून भाजपाच्या नेत्यांनी सुद्धा नाराजगी व्यक्त करीत आहे.जय हिंद!

रमेश लांजेवार
नागपूर

# विजा घेऊन येणाऱ्या पिढ्यांशी बोलतो आम्ही... पीपल्स कॉलेजच्या प्रांगणात फुलला कॉलेज कट्टा

उलगडणार 'जेन झी' ची स्पंदनं..संवाद..यशापयशाच्या कहाण्या.. स्वप्नांचे मखमली अंबर..सात मजली हास्याची थुई थुई कारंजी.. आणि हो, मनाच्या हळव्या कोपऱ्याचे श्वास नि निःश्वासही...




महाविद्यालयीन जीवनाचा शेवट झाला तरी काही गोष्टी आयुष्यभर मनातून पुसल्या जात नाहीत. त्यात पहिल्या क्रमांकावर असतो तो कॉलेज कट्टा. वर्गातील तास संपल्यानंतर मित्र-मैत्रिणींसोबत रंगलेल्या गप्पा, हास्याचे फवारे, भविष्याची रंगवलेली स्वप्ने, कधी यशाची तर कधी अपयशाची चर्चा, कविता, गाणी, नाटकांच्या तालमी, प्रेमाच्या हळव्या भावना आणि आयुष्याला दिशा देणारे असंख्य संवाद. या सगळ्यांचा निःशब्द साक्षीदार म्हणजे कॉलेज कट्टा. वर्षानुवर्षे विद्यार्थी बदलतात, चेहरे बदलतात, पण कट्ट्यावरील आठवणींची ऊब मात्र कायम तशीच राहते.

आजच्या डिजिटल युगात संवादाचे स्वरूप मोठ्या वेगाने बदलत आहे. स्मार्टफोन, सोशल मीडिया आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या प्रभावामुळे नातेसंबंध आभासी जगात अडकत चालले आहेत. व्हॉट्सपवरील संदेश, इन्स्टाग्रामवरील स्टोरी आणि फॉरवर्डच्या गर्दीत मन मोकळे करून बोलणारा मित्र, विचारांना दिशा देणारी चर्चा आणि समोरासमोर व्यक्त होणाऱ्या भावना हळूहळू हरवत चालल्या आहेत. माहितीचा स्फोट झाला असला तरी संवादाचा ओलावा कमी होत असल्याची खंत अनेकदा व्यक्त केली जाते. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना मुक्तपणे व्यक्त होण्यासाठी, विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी, सर्जनशीलतेला वाव देण्यासाठी आणि संवाद संस्कृती अधिक समृद्ध करण्यासाठी नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या पीपल्स कॉलेज परिसरात पीपल्स कट्टा या अनोख्या संवाद व्यासपीठाची निर्मिती करण्यात आली आहे. हा कट्टा केवळ दगड-विटांचे बांधकाम नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देणारा, मैत्रीची नाती अधिक दृढ करणारा आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारा एक जिवंत विचारमंच आहे.

या पीपल्स कट्टा संवाद व्यासपीठाचे उद्घाटन मंगळवारी सकाळी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सोसायटीच्या सचिव प्रा. श्यामल पत्की, उपाध्यक्ष ड. प्रफुल अग्रवाल, सहसचिव ड. प्रदीप नागापूरकर, कार्यकारिणी सदस्य ॲड. चिरंजीलाल दागडिया, पीपल्स हायस्कूल शालेय समितीचे अध्यक्ष नौनिहलसिंह जहागिरदार, प्रा. डॉ. यशपाल भिंगे, प्रा. विलास वडजे, राहुल गोरे, शशी नंदा, प्राचार्य डॉ. विकास सुकाळे, उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे यांच्यासह प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्यसंख्येने उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए डॉ. प्रवीण पाटील यांनी आपल्या मनोगतात कॉलेज कट्ट्याचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, महाविद्यालयीन शिक्षण केवळ पाठ्यपुस्तकांपुरते मर्यादित नसते. विचार करण्याची क्षमता, नेतृत्वगुण, सामाजिक भान, सहिष्णुता, मैत्री आणि आत्मविश्वास यांची जडणघडण अशाच संवादातून होत असते. कट्ट्यावर होणाऱ्या चर्चा अनेकदा विद्यार्थ्यांच्या आयुष्याला नवी दिशा देतात. याच ठिकाणी अनेक कलाकार, साहित्यिक, पत्रकार, प्रशासकीय अधिकारी, उद्योजक, नेते आणि सामाजिक कार्यकर्ते घडण्याची बीजे रुजत असतात.

यावेळी संस्थेच्या दर्पण या मासिकाचेही प्रकाशन करण्यात आले. संस्थांतर्गत प्राध्यापक, शिक्षक कर्मचाऱ्यांच्या अभिव्यक्तीला व्यासपीठ उपलब्ध करून देणारे हे मासिक आणि विद्यार्थ्यांसाठी नव्याने उभारलेला पीपल्स कट्टा ही दोन्ही माध्यमे प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची नवी दारे उघडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.पीपल्स कट्टा हा फक्त बसण्यासाठी उभारलेला कोपरा नाही; तो भावनांचा, विचारांचा आणि स्वप्नांचा संगम आहे. येथून उमटणारे प्रत्येक हास्य, प्रत्येक संवाद, भावना आणि प्रत्येक नवा विचार उद्याच्या समाजाला अधिक संवेदनशील, सुसंस्कृत आणि विवेकी बनविण्याची ताकद बाळगून आहे. वर्षानुवर्षे या कट्ट्यावर असंख्य पावले उमटतील, नवी मैत्री फुलेल, असंख्य स्वप्ने आकार घेतील.

उद्घाटनाचा सोहळा हा केवळ एका कट्ट्याचे किंवा व्यासपीठाचे लोकार्पण नव्हते; तो अनेकांच्या मनात वर्षानुवर्षे जपलेल्या महाविद्यालयीन आठवणींना पुन्हा एकदा उजाळा देणारा भावस्पर्शी क्षण ठरला. कट्ट्यावर एकत्र आलेले प्राध्यापक, कर्मचारी आणि मान्यवर काही क्षणांसाठी जणू काळाच्या प्रवाहात मागे फिरले होते. त्यांच्या चेहऱ्यांवर उमटलेले मंद हास्य, डोळ्यांतील चमक आणि नकळत ओठांवर आलेल्या आठवणी सांगत होत्या की, प्रत्येकाच्या आयुष्यात एक असा कट्टा असतो, जो कधीच विसरला जात नाही. कोणाला मित्रांसोबत रंगलेल्या गप्पा आठवत होत्या, तर कोणाला वादविवाद, सामाजिक, राजकिय चळवळी, कविता, गाणी आणि भविष्याची रंगवलेली स्वप्ने. काहींच्या डोळ्यांत जुन्या मित्रांच्या आठवणींची ओल तरळताना दिसत होती. कार्यक्रमाची औपचारिक सांगता झाली, तरी अनेकजण काही काळ त्या कट्ट्यावरच रेंगाळले. क्षणभरासाठी त्यांना असे वाटत होते की, काळ पुन्हा मागे फिरला आहे आणि आपण पुन्हा एकदा आपल्या महाविद्यालयीन जीवनात, त्या जुन्याच कट्ट्यावर मित्र-मैत्रिणींसोबत मनमोकळ्या गप्पांमध्ये हरवून गेलो आहोत. 'पीपल्स कट्टा' ने उद्घाटनाच्या पहिल्याच दिवशी अनेकांच्या मनात हरवलेल्या आठवणी जाग्या केल्या आणि हे व्यासपीठ केवळ विद्यार्थ्यांचेच नव्हे, तर प्रत्येक माजी विद्यार्थ्याच्या भावविश्वाशी कायमचे जोडले जाणार असल्याची जाणीव उपस्थित प्रत्येकाच्या मनात अलगद रुजवून गेली.

डॉ.विनोद चव्हाण
इंग्रजी विभाग,
पीपल्स कॉलेज कनिष्ठ विभाग.

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष मं.र.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१०७८/२०२६

१. रुक्मीणबाई भ्र.पांडूरंग कोकाटे वय ७६ वर्ष धंदा घरकाम, २. पूरभाजी पि.पांडूरंग कोकाटे वय ४७ वर्ष धंदा शेती, ३. शिवाजी पि. पांडूरंग कोकाटे वय ४० वर्ष धंदा शेती सर्व रा.सांगवी बु.नांदेड ता. जि. नांदेड

विरूध्द

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.


ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत जळबा पि.पांडूरंग पि.मारोतराव कोकाटे यांचे वारस आहेत. मयत पांडूरंग पि.मारोतराव कोकाटे यांचा मृत्यू दिनांक १०/०३/२०२५ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वत: न्यायालयात दिनांक ०९/०९/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २९/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| क. लिपिक | स्वाक्षरित/- |
| ४ थे सह दिवाणी न्यायालय | स.अधिक्षक |
| क.स्तर नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |

# आषाढीनिमित्त शिवाजी प्राथमिक शाळेची ज्ञानदिंडी



नांदेड/प्रतिनिधी-आषाढी एकादशीनिमित्त श्री शिवाजी प्राथमिक शाळा, वजिराबाद व माणिकनगर, नांदेड येथे ज्ञान, भक्ती आणि संस्कारांचा संदेश देणारा ज्ञानदिंडी व पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत सहभागी होत टाळ-मृदुंगाच्या गजरात विठ्ठल नामाचा जयघोष केला. दिंडीमुळे परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून गेला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव भाई गुरूनाथराव कुरूडे हे उपस्थित होते. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पंढरीनाथ काळे यांनी आषाढी एकादशीचे धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगत संतांच्या विचारांचे आचरण जीवनात करण्याचे आवाहन केले. या प्रसंगी सांस्कृतिक विभाग प्रमुख एस. टी. आहेर, वजिराबाद विभागाच्या प्रभारी सौ.ए.टी.गिरे, माणिकनगर विभागाच्या प्रभारी सौ. ए.आर.लाडेकर, सौ.ए.व्ही. तेलंग, सौ. कांताबाई नांगरे, बी.जे. मंगनाळे, ए.जी. नाईक, जी.डी. विश्वासराव, निलेशभाऊ गायकवाड यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.ज्ञानदिंडी व पालखी सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संतपरंपरेबद्दल आदर, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सर्व उपस्थितांनी कौतुक केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# कुंपणानेच शेत खाल्ले?:महसूल-पोलिसांच्या संगनमतातून लाल रेती माफियांचा धुमाकूळ

## रात्रीच्या अंधारात बिलोली-देगलूर ते कर्नाटकपर्यंत टिप्परने बेसुमार वाहतूक

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर-बिलोली तालुक्यातील परिसरात अवैध रेती उत्खनन व चोरटी वाहतूक पुन्हा एकदा जोमात सुरू झाल्याची संतप्त चर्चा नागरिकांतून होत असून, महसूल व पोलिस विभागातील काही कर्मचाऱ्यांच्या भागिदारी व संगनमतामुळेच रेती माफियांचे फावले असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत आहे. कुंपणानेच शेत खाल्ले अशी परिस्थिती निर्माण झाल्याने शासन यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.


बिलोली परिसरातून विना रॉयल्टी १२ ते १४ ब्रास रेती अवघ्या १६ हजार रुपयांत भरून दिली जात असून, हीच रेती कर्नाटकातील औराद व परिसरात सुमारे १८०० रुपये प्रति टन दराने विकली जात असल्याची चर्चा आहे. एका टिप्परमधून लाखभर रुपयांचा व्यवहार होत असल्याने रेती तस्करांची अक्षरशः चांदी होत असल्याचे बोलले जात आहे. येसगी, हिप्परगा, सगरोळी, खतगाव, आदमपूर कमान, शंकरनगर, बेटमोगरा, सलगरा फाटा, खरब, खंडगाव फाटा, बोरगाव फाटा, जाहूर, आंबुलगा, गोणेगाव, मुक्रामाबाद, रावणकोळा मार्गे कर्नाटकातील बावलगाव, होकर्णा व औरादकडे तर कधी आदमपूर फाटा, वन्नाळी फाटा, मनसकरगा, इब्राहीमपूर, खानापूर, तडखेल, उंद्री, जाहूर, आंबुलगा, गोणेगाव, मुक्रामाबाद ते रावनकोळा मार्गे कर्नाटक राज्यातील बावलगाव, होकर्णा व औरादकडे रात्रीच्या अंधारात मोठ्या प्रमाणावर रेती वाहतूक सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. दररोज १५ ते २० टिप्पर व ट्रकांच्या माध्यमातून ही वाहतूक होत असल्याची चर्चा असून, भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रात्री उशिरा रुग्णालयात जाणारे रुग्ण, दुचाकीस्वार, ऑटोचालक व सामान्य प्रवासी यांना या भरधाव वाहनांमुळे जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याची व्यथा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. कधी अपघात होईल याचा नेम नाही, यापुर्वी अनेक अपघात घडले जिवीतहानी झाली असल्याने अशी भीतीही अनेकांनी व्यक्त केली.दरम्यान, महसूल विभाग एसआयआरच्या कामात व्यस्त असल्याची संधी साधून रेती माफिया अधिक सक्रिय झाल्याची चर्चा आहे. काही पोलिस व महसूल कर्मचाऱ्यांकडून तस्करांना पथकांच्या हालचालींची माहिती दिली जात असल्याचे गंभीर आरोप नागरिकांतून होत आहेत. त्यामुळे कारवाईसाठी नियुक्त पथके निष्प्रभ ठरत असून, अवैध वाहतूक करणाऱ्यांना अभय मिळत असल्याची भावना जनतेत निर्माण झाली आहे.अजनी परिसरातील तसेच आदमपूर-मिनकी रोडवरील मुरूम खदानी परिसरात मोठ्या प्रमाणावर रेती साठा करून ठेवण्यात आल्याचीही चर्चा असून, त्याच साठ्यातून रात्रीच्या वेळी वाहतूक केली जात असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. विशेष म्हणजे, जागरूक नागरिकांनी वरिष्ठ महसूल व पोलिस अधिकाऱ्यांच्या कानावर हा प्रकार घातल्यानंतरही पुरावे द्या, माहिती द्या, आम्ही कारवाई करू अशी ठरलेली उत्तरे दिली जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. जेव्हा संपूर्ण परिसराला माहिती आहे, तेव्हा यंत्रणेला कसे दिसत नाही? असा सवाल नागरिक विचारत आहेत. शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा फटका बसत असताना अवैध रेती उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी विशेष संयुक्त मोहीम राबवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. अन्यथा रेती माफिया मजबूत आणि शासन यंत्रणा हतबल अशीच परिस्थिती कायम राहील, अशी तीव्र प्रतिक्रिया जनतेतून उमटत आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंती शांततेत साजरी करावी-डॉ.नीलाभ रोहन

नांदेड/प्रतिनिधी- लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहरातील विविध कार्यक्रम, मिरवणुका शांततेत व उत्साहात साजरे करावे, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी शांतता समितीच्या बैठकीत बोलतांना केले आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालयातील मंथन हॉल येथे बुधवारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त गिरीष कदम, पोलीस उपअधीक्षक रामेश्वर वंजने यांच्यासह शहरातील सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, सा.बां. विभागाचे अधिकारी तसेच शांतता समितीचे सदस्य, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून जयंती उत्सव, सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि परस्पर सहकार्याच्या वातावरणात साजरा व्हावा. कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी. जातीय तेढ निर्माण करणारे फोटो, व्हिडीओ व पोस्ट समाज माध्यमावर प्रसारीत करु नये असे आवाहन पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी केले.

# माविकसंच्या भोकर विभागीय अध्यक्षपदी डी.एस.पवार



किनवट/प्रतिनिधी-महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या नांदेड मंडळांतर्गत भोकर विभागाची नवीन विभागीय कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली. भोकर येथील माता रमाई बुद्ध विहारात वार्षिक सर्वसाधारण सभेत प्रक्रिया पार पडली.

केंद्रीय उपाध्यक्ष विनायकजी ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस झोन अध्यक्ष शंकर घुले, झोन सचिव रामेश्वर कवठेकर, झोन उपाध्यक्ष अविनाश खंदारे, सिद्धार्थ पिंपरे, वैभव सोनसळे, भास्कर कोंडा, रामकिशोर पवार तसेच नितीन भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी भोकर विभागाच्या अध्यक्षपदी डी.एस.पवार (किनवट), सचिवपदी अभिजीत गुंडेराव तर संघटकपदी विक्रम कुरूडे, उपाध्यक्ष म्हणून आकाश क्षीरसागर, अतुल तिव्हाळे, विजय शिंदे, आकाश वाघमारे, बालाजी शिंदे व संतोष फोले यांची निवड झाली. सहसचिवपदी पांडुरंग भोरे व सिद्धेश्वर मेंडके, मुख्य सल्लागार म्हणून राम भोंगाळे व नारायण कावळे, कोषाध्यक्ष म्हणून माधव देशमुखे तर प्रसिद्धीप्रमुख म्हणून संदीप हुलगुंडे व दिलीप जाधव यांची निवड करण्यात आली. कार्यकारी सदस्य म्हणून रामेश्वर डोखळे, उत्कर्ष गुंजाने, वनराज पवार, गणेश ताटीकोंडलवार, नागेश पटपेवाड आणि खलील शहा यांची निवड करण्यात आली. महिला प्रतिनिधी म्हणून पूजा भुरले, रुकसाना बेगम अ. करीम, शोभा कनाके व ज्योती कन्नलवार यांची निवड करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीला मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# डॉक्टरच्या घरी ८ लाखांची चोरी करणाऱ्या पाच जणांना अटक




नांदेड/प्रतिनिधी-डॉक्टराच्या घरातील ८ लाख रुपये रोख रक्कम असलेल्या बॅगेची चोरी करणाऱ्या पाच जणांना इतवारा पोलीसांनी बुधवारी अटक करण्यात आली आहे.

डॉ.शेख शहबाज शेख जाफर (वय ४०), रा.नौमानिया कॉलनी,नांदेड हे देगलूर नाका भागातील मदिनानगर येथे भाड्याने राहत होते. दि.२४ जुलै रोजी मदिनानगर येथुन नौमानिया कॉलनी,नांदेड येथे घरातील सामान स्थलांतरित करीत असतांना त्यांच्या वैद्यकीय क्षेत्रातील व अपघात विम्यामध्ये मिळालेले ८ लाख १२ हजार रुपये असलेली रक्कमेची बॅग लंपास करण्यात आली. याप्रकरणी डॉ.शेख शहबाज शेख जाफर यांनी बुधवार दि.२९ जुलै रोजी इतवारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस अधीक्षक डॉ.निलाभ रोहन, पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा पोलीस स्टेशनचे रामेश्वर खन्नाळ, पोलीस निरिक्षक संजय शिंदे, फौजदार आगलावे व पोलीस कर्मचाऱ्यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे तसेच इतर माहिती गोळा करुन काही तासातच पिराजी बाळू वाघमारे, सुनील बाबुराव रॅपनवाड, सुनील चिमणाजी वाघमारे, साहेबराव पिराजी वाघमारे, तनुष्क गणपत मेटकर रा.चिखलवाडी, नांदेड या पाच जणांना अटक केली. त्यांनी डॉ.शेख यांच्या घरातून रक्कम असलेली बॅग चोरी केल्याची कबुली दिली. पोलीसांनी ८ लाख १२ हजार रुपयाची रक्कम जप्त केली आहे.


## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार नामे दिगांबर पि.इरबाजी गुरुपवार, रा.लालवंडी, ता.बिलोली, जि.नांदेड यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरून सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की,

हे की, (१) गंगाधर पि.पंढरीनाथ पत्तेवार, (२) राजेश्वर पि. उध्दवराव मेडेवार दोघे रा.नायगांव, ता.नायगांव, जि.नांदेड यांच्या सामाईक मालकी व ताब्यातील मौजे नायगांव (बा), ता.नायगांव (खै), जि.नांदेड येथील गट क्र.६८ मध्ये १ हेक्टर २१-आर. जमीन सदरील दोघांच्या नांवाने सामाईक क्षेत्रामध्ये आहे. सदरील जमीनीमध्ये सदरील दोघांनी व इतरांनी प्लॉटींग टाकलेली आहे. सदरील दोघांनी दोघांनी व इतर यांनी मिळून एकमेकांच्या आपसीक संमतीने मे.श्री बालाजी इंटरप्रायझेस, नवा मोंढा, नायगांव (बा), ता. बिलोली, जि.नांदेड अंतर्गत एक स्कीम काढली, सदरील स्कीमचे नांव सुलभ हप्त्याने प्लॉट स्कीम योजना शास्त्री नगर, नायगांव (बा), ता. बिलोली, जि. नांदेड असे होते. सदरील स्कीम ही अशा प्रकारची होती की, सदरील स्कीममध्ये रु.१५०/- दरमहा संबंधित सभासदाने भरावेत व दरमहिन्याला एक लक्की ड्रॉ काढण्यात येईल व लक्की ड्रॉ मधील विजेत्यास वर नमूद जमीन गट क्र.६८ मधील एक प्लॉट देण्यात येईल व विजेते सभासदास पूढील हप्ते भरण्याची आवश्यकता राहणार नाही अशा प्रकारची स्कीम होती. माझे पक्षकार हे सदरील स्कीम / योजनेचे सभासद झाले व त्यांनी सदरील लोकांकडे सदरील योजनेची दरमहा हप्त्यांची रक्कम भरणा केली व त्यानंतर माझे पक्षकार हे दिनांक १०-०४-१९९१ रोजी सदरील बालाजी इंटरप्रायझेस लक्की ड्रॉ या स्कीमच्या लक्की ड्रॉचे विजेते झाले व त्यांना सदरील स्कीममध्ये एक प्लॉट लागला व सदर वर नमूद लोकांनी माझे पक्षकार यांना त्यांच्या सदरील वर नमूद जमीन गट क्र.६८ मधील एक प्लॉट देण्याचे मान्य व कबूल केले. परंतू माझे पक्षकार यांनी सदरील (१) गंगाधर पि.पंढरीनाथ पत्तेवार, (२) राजेश्वर पि.उध्दवराव मेडेवार यांना वारंवार विनंती करून सुध्दा त्यांनी माझे पक्षकार यांना सदरील गट नं.६८ मध्ये कोणताही प्लॉट हा आजतागायत दिला नाही व त्यांनी माझे पक्षकार यांची फसवणूक व हेळसांड केलेली आहे.

असे असतांना (१) गंगाधर पि.पंढरीनाथ पत्तेवार, (२) राजेश्वर पि.उध्दवराव मेडेवार हे दोघेही त्यांच्या सामाईक मालकी व ताब्यातील मौजे नायगांव (बा), ता. नायगांव (खै), जि.नांदेड येथील गट क्र.६८ मधील १ हेक्टर २१-आर. जमीन ही इतर त्रयस्थ व्यक्तीस विक्री, हस्तांतरण करण्याच्या व त्यात त्रयस्थ व्यक्तीचे हक्क संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत आहे, जे की पूर्णतः बेकायेदशिर आहे. सदरील जमीनीमध्ये माझे पक्षकार यांचा एक प्लॉट आहे.

सबब सर्व जनतेस व संबंधितांस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, सदर मौजे नायगांव (बा), ता.नायगांव (खै), जि.नांदेड येथील गट क्र.६८ मध्ये १ हेक्टर २१-आर. जमीनी बाबत कुणीही (१) गंगाधर पि.पंढरीनाथ पत्तेवार, (२) राजेश्वर पि.उध्दवराव मेडेवार यांच्या सोबत कुणीही कसल्याही प्रकारचा खरेदी, विक्री, हस्तांतर, गहाण, तारण, भेट, बक्षीस, कर्ज ई. व्यवहार करू नये केल्यास ते बेकायदेशिर राहील व तो माझ्या पक्षकारांवर कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही व माझे पक्षकार हे संबंधित व्यवहारकर्त्या विरुध्द योग्य त्या सक्षम न्यायालयात योग्य ती दिवाणी व फौजदारी कायदेशिर कार्यवाही करतील व त्याच्या होणाऱ्या खर्चास व परिणामांस संबंधित व्यवहारकर्ते सर्वस्वी जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक - ०७-२०२६

मार्फत

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | जाहीर प्रगटन देणार |
| ॲड.बी.आर.सोनाळे | स्वाक्षरित/- |
| कर्मविर नगर,ग्यानमाता स्कूल | दिगांबर पि.इरबाजी गुरुपवार |
| जवळ,विमानतळ रोड, | रा.लालवंडी,ता.बिलोली,जि.नांदेड |
| नांदेड, मो.नं. ८८०५४३१९७६ | मो.नं.७७९८८०५७२३ |


# २५ वीज ग्राहक तक्रारींचा निपटारा

नांदेड/प्रतिनिधी-महावितरणच्या ग्राहक तक्रार निवारण मंच नांदेडचे अध्यक्ष म्हणून निवृत अतिरिक्त कार्यकारी अधिकारी डॉ.अशोक कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली असून प्रत्यक्षात ते १५ मार्च पासून कार्यरत आहेत. माधव डोमपले हेही स्वायत सदस्य म्हणून कार्यरत आहेत. डॉ.कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली आजपर्यंत २५ ग्राहक तक्रार प्रकरणाचा निपटारा करण्यात आला आहे. ग्राहकांच्या तक्रारींचे जलद, पारदर्शक व न्याय पद्धतीने निवारण करण्यासाठी ग्राहक तक्रार निवारण मंच, नांदेड येथे कार्यरत आहे. महावितरणच्या या मंचाच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांच्या नवीन विद्युत जोडणी, वीज देयके, मीटर व वीज पुरवठ्या संदर्भातील तक्रारी ऑनलाईन पध्दतीने संकेतस्थळावर नोंदविता येतील. नोंदविलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी संबंधित मंचामार्फत सुनावणी घेउन तक्रार निवारण होणार आहे.


## जाहीर प्रगटन

मा.श्री ए.जी.चव्हाण, ७ वे सह दिवाणी न्यायाधिश
क.स्तर, नांदेड
किरकोळ दिवाणी अर्ज क.१०८०/२०२६
पुष्पाबाई व इतर विरुद्ध निरंक

अर्जदार १. पुष्पाबाई भ्र.पांडुरंग आवतिरक वयः ६८ वर्षे, धंदा : घरकाम, २. अनिल पि.पांडुरंग आवतिरक वयः ४२ वर्षे, धंदा : शेती, ३. साईनाथ पि.पांडुरंग आवतिरक वयः ३९ वर्षे, धंदा : शेती, सर्व रा.सिध्दनाथ, ता.जि.नांदेड, ४. अनुराधा पि.साहेबराव थेटे वयः ४८ वर्षे, धंदा : घरकाम, रा.टाकळगाव, ता.लोहा, जि.नांदेड, ५. सुनिताबाई भ्र.रुकमाजी जाधव वयः ४३ वर्षे, धंदा : घरकाम, रा.मालकौठा, ता.मुदखेड, जि.नांदेड, ६. माधुरी भ्र. कालीदास जाधव वय ४१ वर्षे, धंदा घरकाम, रा.कुडला, ता.उमरी, जि.नांदेड

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना कायदेशीर वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जदार हे मयत पांडुरंग पि. संभाजी अवतिरक यांचे कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्र. १ ही त्यांची पत्नी व अर्जदार क्र.२ ते ६ ही त्यांची अपत्ये आहेत. त्यांचा मृत्यू दिनांक ०९/१२/२०२५ रोजी नांदेड येथे झाला, त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र नांदेड महानगरपालिकेने निर्गमित केले असून त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राच्या प्रती प्रस्तुत संचिकेत दाखल करण्यात आलेल्या आहेत. अर्जदाराच्या अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारस नाही, असे अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे. अर्जदारास शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयीन कामासाठी वारसाहक्क प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार यांना मयत पांडुरंग पि. संभाजी अवतिरक यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकीलामार्फत या न्यायालयात दिनांक २९/०८/२०२६ पर्यत किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत हजर राहून आक्षेप नोंदवावा सादर करावा. या तारखेनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच अर्ज एकतर्फी निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

करिता हे जाहीर प्रगटन आज दिनांक २२/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरून |
| कनिष्ठ लिपीक | स्वाक्षरित/- |
| ७ वे सह दिवाणी न्यायालय | सहायक अधिक्षक |
| क.स्तर,नांदेड. | दिवाणी न्यायालय व.स्तर नांदेड. |



## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
Civil M.A.No.730/2026
CNR Number : MHND020014722026

अर्जदार : १. मोहम्मद खुदरतुल्लाह मोहम्मद इनायतुल्लाह वय : ५७ वर्ष, धंदा : व्यापार रा. घर क्र.९-२-१२९, ब्रह्मपुरी, ब्रह्मपुरी जवळ, इतवारा,नांदेड मोबा.क्र.९९६०५०२५२१

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

दावा : बॉम्बे रेग्युलेशन कायदा VIII च्या १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदार हे मयताचा मुलगा आहे. मयत मोहम्मद इनायतुल्ला पिता मोहम्मद नसरुल्ला, रा. ब्रह्मपुरी चौफाळा, नांदेड येथील रहिवासी होते. त्यांचे दिनांक १५-०४-२००८ रोजी नांदेड येथे निधन झाले आहे.

मयत नामे मोहम्मद इनायतुल्ला पिता मोहम्मद नसरुल्ला, यांना अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत, असे अर्जदारांनी नमूद केले आहे. अर्जदार यांनी वारसहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. मय्यत नामे मोहम्मद इनायतुल्ला पिता मोहम्मद नसरुल्ला यांना अर्जदार यांचे शिवाय कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांनी नमूद केले आहे. अर्जदार यांनी वारसहक्क प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील अर्जदारांना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिलामार्फत तीस दिवसांच्या आत किंवा दिनांक ०४-०९-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे. अन्यथा अर्जदारांच्या बाजूने योग्य तो आदेश पारित केला जाईल, याची सर्व जबाबदारी संबंधितांवर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २७-०७-२०२६ रोजी माझ्या सहिनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | आदेशावरुन |
| **क.लिपीक** | स्वाक्षरित/- |
| ४ थे सह दिवाणी न्यायालय | **सहाय्यक अधिक्षक** |
| व.स्तर,नांदेड | दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड |


# १ ऑगस्ट रोजी जज्बात गझल गायनाची अनोखी मैफल

नांदेड/प्रतिनिधी-येथील कलांगण प्रतिष्ठान व दै.प्रजावाणी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि.१ ऑगस्ट रोजी सायं.६-३० वा.कुसुम सभागृहात जज्बात कुछ तुम्हारे, कुछ हमारे एक सुहानी शाम, गजलों के नाम हा हिंदी, मराठी चित्रपटांतील गाजलेल्या लोकप्रिय गझलांचा बहारदार कार्यक्रम होणार आहे.यावेळी प्रख्यात गझल गायिका वर्षा जोशी व प्रसिद्ध गझल गायक वैभव पांडे आपला गायनाविष्कार सादर करणार आहेत. यावेळी साथसंगत सारंगी- संदीप मिश्रा, तबला-अदित्य पांडे, किबोर्ड- शौनक जपे यांची असणार आहे.

सदरील सुरेल गझल गायनाच्या कार्यक्रमाची संकल्पना ॲड. गजानन पिंपरखेडे, निर्मिती अध्यक्ष रमेश मेगदे यांची असून प्रसिद्ध निवेदक व गझलकार बापू दासरी यांचे अनोख्या शैलीतील अभ्यासपूर्ण निवेदन लाभणार आहे. उद्घाटक म्हणून मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची तर प्रमुख अतिथी म्हणून हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अरूण मान्नीकर व मणका विकारतज्ज्ञ डॉ. उमेश कानडे यांची उपस्थिती लाभणार आहे.सदरील चौथा कार्यक्रम कलांगण प्रतिष्ठानच्या वार्षिक सदस्यांकरिता आयोजित केला असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य यानुसार आसन व्यवस्था असणार आहे. तसेच यापूर्वी झालेल्या तीन कार्यक्रमांना रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला असून विशेषतः सुरजो भट्टाचार्य यांची यसुदास यांच्या गाण्यांची मैफल, मृदुला दाढे आणि संपदा गोस्वामी यांचे कार्यक्रम अजूनही रसिकांच्या स्मरणात आहे. सन २०२६-२७ ची सदस्य नोंदणी या गझल कार्यक्रमाच्या वेळी कुसुम सभागृहात होणार आहे. तरी कलांगण प्रतिष्ठानच्या सर्व वार्षिक सदस्यांनी कार्यक्रमास वेळेवर उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन दै. प्रजावाणीचे संपादक शंतनु डोईफोडे व कलांगण प्रतिष्ठानने केले आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय लांजी,ता.माहूर,जि.नांदेड

ग्रामपंचायत लांजी अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनेसाठी 'नळ पाणीपुरवठा कर्मचारी' हे पद मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात भरावयाचे आहे.

- शैक्षणिक पात्रताः किमान १२ वी पास आणि MS-CIT उत्तीर्ण.
- प्राधान्यः I.T.I. (प्लंबर/वायरमन/इलेक्ट्रिशियन इ.) धारकास व अनुभवी उमेदवारास विशेष प्राधान्य.
- महत्त्वाची अटः उमेदवार लांजी गावातील स्थानिक रहिवासी असावा व अर्जासोबत ग्रामपंचायतीचे 'ना-देय' (थकबाकी नसल्याचे) प्रमाणपत्र जोडणे अनिवार्य आहे.
- वय मर्यादाः १८ ते ३८ वर्षे (मागासवर्गीयः १८ ते ४० वर्षे).

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **ग्रामपंचायत अधिकारी** | **सरपच** |
| ग्रामपचायत कार्यालय, लांजी | श्री.मारोती बडु रेकुलवार |
| ता.माहुर जि.नांदेड | ग्रामपंचायत कार्यालय, लाजी ता.माहुर जि.नादेड |


# जुगार अड्डयावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-भोकर येथील शाळेच्या पाठीमागे सुरु असलेल्या जुगार अड्डयावर मंगळवारी रात्री पोलीसांनी धाड टाकुन पाच जणांना अटक केली.

भोकर शहरातील शाळेच्या पाठीमागे जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. मंगळवारी रात्री ११ च्या सुमारास पोलीसाच्या पथकाने सदरील जुगार अड्डयावर छापा टाकला. पैसे लावून झन्नामन्ना नावाचा जुगार खेळत असताना अरबाजखान अहमदखान रा. सईदनगर, भोकर व इतर चार जणांना रंगेहाथ पकडले. त्यांच्याकडून रोख रक्कम, जुगाराचे साहित्य असा २६ हजाराचा ऐवज जप्त केला.

# जिल्हा परिषद शाळेसमोरील नाल्याच्या कामावर प्रश्नचिन्ह;तांत्रिक चौकशीची मागणी

हदगांव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील जिल्हा परिषद शाळेसमोरील सुरू असलेल्या सिमेंट नाल्याच्या बांधकामाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले असून या कामाची तांत्रिक तपासणी करून आवश्यक ती कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात नगरपरिषद प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले असून नाल्याच्या कामातील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

जिल्हा परिषद शाळेसमोर सध्या सिमेंट नाल्याचे काम सुरू असून या कामामुळे शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच कामाच्या ठिकाणी अपघाताचा धोका निर्माण झाल्याने पालक व नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दिलेल्या निवेदनानुसार, संबंधित नाल्याला तांत्रिक मान्यता कोणत्या निकषांवर देण्यात आली, याबाबत शंका व्यक्त करण्यात आली आहे. नाल्याला योग्य आउटलेट नसल्याचे दिसून येत असून पावसाचे पाणी नेमके कुठे वाहून जाणार, याबाबत कोणतीही स्पष्ट व्यवस्था नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे पावसाळ्यात परिसरात पाणी साचून विद्यार्थी, पालक व नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.विशेष म्हणजे, जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात खासदारांच्या शैक्षणिक संस्थाही कार्यरत आहेत. अशा ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा पुरेसा विचार न करता काम सुरू केल्याबद्दल नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे निवेदनात म्हटले आहे. नाल्याच्या कामाची तात्काळ प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी., कामास देण्यात आलेल्या तांत्रिक मंजुरीची सखोल चौकशी करण्यात यावी., नाल्याला योग्य आउटलेटची कायमस्वरूपी व्यवस्था करून पावसाचे पाणी सुरळीत वाहून जाण्याची खात्री करावी., विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक संरक्षणात्मक उपाययोजना तातडीने राबवाव्यात.कामात दोष आढळल्यास संबंधित अधिकारी व कँत्राटदारावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.,या गंभीर प्रकरणाची नगरपरिषद प्रशासनाने तातडीने दखल घेऊन वस्तुस्थितीची चौकशी करावी तसेच केलेल्या कारवाईची माहिती अर्जदारांना कळवावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

हदगाव नगर परिषदेत काँग्रेस शिवसेना व भाजपाचे नगरसेवक कार्यरत असून या नपा कार्यालयाच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या खासदाराच्या शाळे समोर कोणतेही नियोजन न करता सिमेंट नालीचे बांधकाम होत असताना याबाबतीत आत्ता पर्यंत कोणतीही नगरसेवकांनी याबाबतीत आक्षेप घेतलेला नसल्याचे दिसून आलेले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिरच्या अभियानच्या २७ जुलै २०२६ दरम्यान आ.बाबूरावजी कदम कोहळीकर यांच्या निदर्शनास ही बाब काही जागरूक नागरिकांनी निदर्शनास आणून दिली असता त्यांनी लगेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक भोकर यांच्याशी संपर्क साधून याबाबत प्रत्यक्ष जाऊन तेथे चौकशी करून केलेल्या कारवाईचा अहवाल मला सादर करावा तोपर्यंत काम रोखण्यात यावे अशा सूचना त्यांना केल्या होत्या. सार्वजनिक बांधकामाचे कार्यकारी अभियंता चोपडे यांनी प्रत्यक्ष न येता स्थानिय इंजिनियरला पाठविले असता त्यांच्या सिमेंट नादी बांधकामात कशा त्रुटी आहेत, हे तेथील नागरिकांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिलेले आहेत.

### केवळ कंत्राटदराचा फायदा..!

हदगाव शहरात जिथे आवश्यकता आहे. तिथे सिमेंट नाल्याचे बांधकाम व रोडचे काम न टाकता भलत्याच ठिकाणी काम टाकून केवळ थातूरमातूर कामे करून राजकीय दबाव टाकून राजकीय दबाव टाकून बिले काढण्यात येत असल्याच स्पष्ट जाणवत आहे. आणखी विशेष म्हणजे काही राजकीय नेत्यांचे जवळचे कार्यकर्ते शासकीय कंत्राटदारांच्या नावे बोगस कामे करून शासनाच्या निधीचा योग्य वापर होत नसल्याने आतापर्यंत झालेल्या रोड काम व सिमेंट रस्त्यांची शहरातील सखोल चौकशी झाली तर सदरील बाब शासनाचा निधीचा किती गैरवापर झाला हे दिसून येईल. आणखी विशेष म्हणजे काही राजकीय नेत्यांची जवळचे कार्यकर्ते मुंबई ते जिल्हा पातळीवरच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बड्या राजकीय नेत्यांशी कसे जिव्हाळ्याचे संबंध आहेत हे अप्रत्यक्षरीत्या सोशल मीडियावर दाखवत असतात. यामुळे शहरातले स्थानिक पातळीवर संबंधित कर्मचारी अशा कार्यकर्त्यांना दपकूनच असतात हे उल्लेखनीय.

## ८ व्या वेतन आयोगाचा अहवाल लवकरच; सरकारची संसदेत माहिती

नवी दिल्ली:आठव्या केंद्रीय वेतन आयोगाचा अहवाल ३ मे २०२७ पर्यंत सादर केला जाईल, अशी माहिती केंद्रीय अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी राज्यसभेत दिली. सरकारने स्पष्ट केले की, आयोगाचा अहवाल आल्यानंतर त्यावरील शिफारशींचा अभ्यास करूनच अंमलबजावणी बाबत निर्णय घेतला जाईल. शिफारशी तातडीने लागू करण्याचे सरकारवर कोणतेही कायदेशीर बंधन नाही. मात्र, मंजुरीनंतर सुधारित वेतनश्रेणी १ जानेवारी २०२६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याची शक्यता आहे. दरम्यान, कर्मचारी संघटनांनी ३.८३ फिटमेंट फॅक्टरचा प्रस्ताव मांडला आहे.

# माहूर तालुक्यात सर्वदूर पाऊस;सूर्यदर्शन नाही

## चारही मंडळांत संततधार,जनजीवन विस्कळीत



माहूर/प्रतिनिधी-माहूर तालुक्यात बुधवारी रात्रीपासून सुरू झालेल्या पावसाने गुरुवारी दिवसभर चांगलीच हजेरी लावली. गुरुवार, दि. ३० जुलै रोजी तालुक्यात दिवसभर सूर्यदर्शन झाले नाही. चारही महसूल मंडळांत पावसाची संततधार सुरू राहिल्याने जनजीवन काही प्रमाणात विस्कळीत झाले.

गेल्या पाच दिवसांपासून तालुक्यात रिमझिम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. यापूर्वी झालेला पाऊस अत्यल्प असल्याने शेतीसह नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण होते. मात्र, बुधवारी रात्रीपासून पावसाचा जोर वाढल्याने तालुक्यातील बहुतांश भाग ओला चिंब झाला आहे. या पावसामुळे खरीप पिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे.आज गुरुवारी दिवसभर पावसाची रिपरिप सुरूच राहिल्याने रस्ते, बाजारपेठ तसेच दैनंदिन व्यवहारांवर परिणाम झाला. मात्र, अद्याप तालुक्यातील नदी-नाल्यांना पूर आलेला नसून परिस्थिती नियंत्रणात आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास नदी-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.तालुक्यातील चारही महसूल मंडळांत पावसाची संततधार सुरू असल्याने प्रशासनाने नदी-नाले व सखल भागातील परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहे.

# आ.प्रताप पाटील चिखलीकरांच्या वाढदिवसानिमित्त इंदुरीकर महाराज यांचा कीर्तन सोहळा





नांदेड/प्रतिनिधी-मराठवाड्याचे लोकनेते, नांदेड जिल्ह्याचे माजी खासदार तथा लोहा विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसा निमित्त महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार व समाज प्रबोधनकार निवृत्ती महाराज इंदुरीकर यांच्या कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

हा कीर्तन सोहळा शनिवार, दि.१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता नांदेड शहरातील आशीर्वाद गार्डन मंगल कार्यालय, छत्रपती चौक येथे होणार आहे. निवृत्ती महाराज इंदुरीकर हे आपल्या विनोदी, मिश्कील आणि बोचऱ्या शैलीतून सामाजिक वास्तवावर भाष्य करत जनजागृती करणारे लोकप्रिय कीर्तनकार म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहेत. त्यामुळे त्यांच्या कीर्तनातून मनोरंजनासोबतच समाजप्रबोधनाचा संदेश मिळणार आहे. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष माधव पावडे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस संग्राम पाटील मोरे यांनी केले आहे. या कीर्तन सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून समाज प्रबोधनाच्या या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक माधवराव पावडे व संग्राम पाटील मोरे यांच्या वतीने करण्यात आले आहे. आ. प्रताप पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त १ ऑगस्टपासून पाच दिवस नांदेडसह कंधार व लोहा मतदारसंघात विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# स्व.शिवलालजी राठी स्मृती राज्यस्तरीय निबंध स्पर्धा उत्साहात

उमरखेड/प्रतिनिधी-स्व. शिवलालजी गोकुलदासजी राठी यांच्या स्मरणार्थ नांदेड येथील हरिकिशनजी बजाज मेमोरियल माहेश्वरी शिक्षण विकास संस्था व स्व. शिवलालजी राठी स्मृती प्रतिष्ठानच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय भव्य निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

शुक्रवार, दि.२४ जुलै रोजी उमरखेड येथील साकळे विद्यालयात झालेल्या या स्पर्धेत इयत्ता ८ वी ते १२ वीच्या ३७५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना आणि सामाजिक भान जागृत व्हावे, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेचा विषय ऐनवेळी जाहीर करण्यात आला होता. मराठी, हिंदी किंवा इंग्रजी यापैकी कोणत्याही एका भाषेत ४०० शब्दांत विद्यार्थ्यांनी निबंध लिहिला. गेल्या ५ वर्षांपासून ही स्पर्धा विदर्भ-मराठवाडा विभाग स्तरावर घेतली जात आहे. स्पर्धेतील विजेत्यांना १५ ऑगस्ट रोजी मुख्य स्वातंत्र्यदिन सोहळ्यात रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विभाग स्तर-प्रथम-रु.५,१००/-, द्वितीय-रु. ३,१००/-, तृतीय-रु. २,१००/-, उत्तेजनार्थ (३)-प्रत्येकी रु. १,१००/-, स्थानिक स्तर-प्रथम-रु. १,१००/-, द्वितीय- रु. ७५०/-, तृतीय-रु. ५००/-ही स्पर्धा डॉ. सुशील राठी व गोपाललालजी लोया यांच्या मार्गदर्शनात शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. यशस्वितेसाठी संदीप भट्टड, स्वप्नील काचर्डे, नंदकिशोर पुरमे, गणेश कळलावे यांच्यासह सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षकांनी परिश्रम घेतले.


जा.क्रं.नांवाशमनपा/जवमा/५००२/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
दिनांक - २९ जुलै २०२६

**ई-लिलाव सुचना (दुसऱ्यांदा)**

सर्व नागरिकांना या जाहिर ई-लिलाव (E-AUCTION) सुचनेद्वारे कळविण्यात येते की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका मालकीचे काबरानगर जलशुद्धीकरण केंद्र येथील नव्याने बांधण्यात आलेल्या गाळ्यांपैकी दिव्यांगासाठी आरक्षीत असलेला ०१ गाळा ३० वर्षासाठी भाडेपट्टीवर द्यावयाचा आहे.

ईच्छुक नागरिकांनी/व्यापाऱ्यांनी लिलावात विहित मुदतीत भाग घेण्यासाठी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर digital signature चे रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे.

लिलावधारक/ठेकेदार यांनी लिलाव फी रूपये ५०००/- नापरतावा व इसारा रक्कम म्हणून रू.२५,०००/- आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड यांच्या नावे असलेले खाते क्रं.५०२००११८९३६४३६ IFSC CODE- HDFC०००१०१६ एचडीएफसी बँक, शाखा बरारा टॉवर, डॉ.लेन, नांदेड या खात्यामध्ये RTGS/NEFT करून त्या बाबतची पावती अपलोड करणे अनिवार्य आहे.

सदरील ई-लिलावाच्या नियम व अटी तसेच साईटवर अपलोड करावयाच्या कागदपत्रांची यादी (https://eauction.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, सदरचा ई-लिलाव (E-AUCTION) ऑनलाईन इंटरनेटवर भरता येईल.

**ई-लिलाव प्रक्रियेचे वेळापत्रक**

| अ.क्रं. | तपशिल | लिलाव प्रसिद्धीचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | प्रसिद्ध दिनांक | ३०/०७/२०२६ | १५:०० |
| २ | कागदपत्र/इसारा रक्कम सुरु करण्याचा दिनांक व वेळ | ३०/०७/२०२६ | १६:०० |
| ३ | कागदपत्र/इसारा रक्कम सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | १३/०८/२०२६ | १५:०० |
| ४ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा दिनांक व वेळ | १३/०८/२०२६ | १५:०० |
| ५ | कागदपत्र/इसारा रक्कम मंजुरीचा अंतिम दिनांक व वेळ | १८/०८/२०२६ | १८:०० |
| ६ | ई-लिलाव सुरु करण्याचा दिनांक व वेळ | १९/०८/२०२६ | ११:०० |
| ७ | ई-लिलाव अंतिम दिनांक व वेळ | १९/०८/२०२६ | १७:०० |

कोणतेही कारण न देता लिलाव अंशतः/पुर्णता मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अंतिम अधिकार मा.आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना राखुन ठेवला आहे.

ई-लिलाव बाबत काही शंका अथवा तांत्रिक अडचणी असल्यास कृपया २४X७ हेल्पलाईन नं.१८००-३०७०-२२३२ या टोल फ्रि नंबरवर संपर्क साधावा.
(मा.आयुक्त यांच्या मान्यतेने)

स्वा/-
**उपआयुक्त**
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड


# ग्रामपंचायत अधिकारी संघटनेच्या अध्यक्षपदी शिवाजी मठ्ठमवाड



देगलूर/प्रतिनिधी- देगलूर पंचायत समिती अंतर्गत कार्यरत ग्रामपंचायत अधिकारी तालुका संघटनेच्या अध्यक्षपदी शिवाजी मठ्ठमवाड यांची निवड एका बैठकीत करण्यात आली आहे.

दि.२४ मार्च रोजी ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे अध्यक्ष श्रीकांत बोडावार यांच्या अपघाती निधनामुळे अध्यक्षपदासह काही पदे रिक्त झाली होती. रिक्त पदाच्या निवडीसाठी एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या रिक्त पदासाठी ही निवड प्रक्रिया पार पडली आहे. या निवड प्रक्रियेत मानद अध्यक्षपदी के.डी. सूर्यवंशी, कार्याध्यक्षपदी एम.डी. सूर्यवंशी, कोषाध्यक्षपदी बी.बी. जोंधळे, महिला उपाध्यक्षपदी सौ. अनिता मुंडकर यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी जेष्ठ ग्रामपंचायत विकास अधिकारी उमाकांत येडे, सुधाकर बिरादार, शिवकुमार ताडकोले, निलेश कुलकर्णी, जिल्हा सहसचिव राजेश तोटावाड, व देगलूरचे तालुका सचिव राजेश्वर नूचे, यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली. नव्या पदाधिकाऱ्यांवर संघटनेची धुरा सांभाळण्याची जबाबदारी देण्यात आल्याची माहिती ग्रामविकास अधिकारी राजेश्वर नूचे यांनी दिली. नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीबद्दल ग्रामपंचायत अधिकारी व सहकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अमित शाहांनी राजीनामा द्यावा;खरगेंची मागणी

नवी दिल्ली: दिल्लीतील विद्यार्थी आंदोलनादरम्यान झालेल्या लाठीचार्ज, अश्रूधूर, वॉटर कॅनन आणि पॅलेट गनच्या वापराबाबत सरकारला धारेवर धरत, या कारवाईचे आदेश कोणी दिले, याचे उत्तर देशाला हवे आहे. उत्तर देता येत नसेल तर अमित शाह यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केली.

सार्वजनिक परीक्षा अयोग्य मार्गांचा प्रतिबंध (सुधारणा) विधेयक २०२६ वर राज्यसभेत झालेल्या चर्चेदरम्यान काँग्रेस अध्यक्ष तथा राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल करत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याची मागणी केली. राज्य मंत्री जितेंद्र सिंह यांनी राज्यसभेत सार्वजनिक परीक्षा अयोग्य मार्गांचा प्रतिबंध (सुधारणा) विधेयक २०२६ मांडले. हे विधेयक यापूर्वी लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर झाले आहे. या विधेयकावरील चर्चेत सहभागी होताना खरगे यांनी परीक्षा व्यवस्थेतील त्रुटी, पेपरफुटी आणि विद्यार्थ्यांवरील कारवाईवरून केंद्र सरकारवर निशाणा साधला.पेपर चोरणारे मोकाट फिरत आहेत, मात्र प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाण सहन करावी लागत आहे. हा कसला न्याय? असा सवाल करत त्यांनी पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याचे सांगितले. अनेक कुटुंबे मानसिक त्रासातून जात असून, सरकारने केवळ कठोर शिक्षेच्या तरतुदी करून प्रश्न सुटणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# देगलूर येथील कृषि विभागाच्या जमिनीवर अतिक्रमण करू नये

## उपविभागीय कृषि अधिकारी यांचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी-उपविभागीय कृषि अधिकारी देगलूर यांच्या अंतर्गत कृषि चिकित्सालय तालुका बीजगुणन केंद्र देगलूर यांच्या ताब्यात महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागाची एकूण ६१.५८ हेक्टर जमीन असून ती देगलूर-हैदराबाद रोड लगत आहे. यापैकी गट क्रमांक १९९ क्षेत्र १३.४४ हेक्टर, गट क्रमांक २८९ क्षेत्र १.०९ हेक्टर, गट क्रमांक २९० क्षेत्र ०.२९ हेक्टर आणि गट क्रमांक २०० क्षेत्र १०.२२ हेक्टर या गटाची सीमा शहरालगत आहे. या क्षेत्रावर किंवा देगलूर हैदराबाद रोड लगत असलेल्या कृषि विभागाच्या क्षेत्रावर सीमा निश्चित नाही. सदरील गटांची सीमा निश्चित होईपर्यंत कोणीही या जमिनीवर तारेचे कुंपण, पत्र्याची शेड, अथवा बांधकाम करून अतिक्रमण करू नये. अन्यथा संबंधितांवर महाराष्ट्र महसूल संहिता १९६६ अंतर्गत कलम ५३, ४० आणि ५१ अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा देगलूर उपविभागीय कृषि अधिकारी यांनी दिला आहे.

पान १ वरुन

## नांदेड जिल्ह्यात पावसाची...

आहे. यानंतर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व विभागप्रमुख, महसूल, पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, महावितरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना सतर्क राहण्याचे निर्देश दिले. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने मदतकार्य सुरू करण्यासाठी सर्व यंत्रणांना सज्ज ठेवण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नागरिकांना कमी उंचीच्या पुलांवरून पाणी वाहत असताना कोणत्याही परिस्थितीत पायी किंवा वाहनाने प्रवास करू नये, नदीकाठावरील पर्यटनस्थळांवर जाणे टाळावे, सखल भागातील नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्यास सहकार्य करावे तसेच अफवांवर विश्वास न ठेवता केवळ अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात नियमांचे उल्लंघन करून स्वतःचा किंवा इतरांचा जीव धोक्यात घालणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४